26-04-2024-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 4/25/2024 11:23 PM Page 1




मोदींच्या सभेमुळे मताधिक्य वाढेल!

पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



विराटची संयमी, पाटीदारची वादळी खेळी

पान ८ वर

वेर्णा, शुक्रवार २६ एप्रिल २०२४ | पाने ८ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 12, Issue 236 | Verna, | facebook.com/dainikherald Friday 26 April, 2024 | Pages 8 | ₹ 4

## आजचे संपादकीय

महत्त्वाच्या प्रश्नांकडे डोळेझाक ?

–पान ४

# आचारसंहितेपूर्वी लाखो चौ.मी. जमिनीचे रूपांतरण

## नगरनियोजन कायदा कलम १७ (२) चा वापर : अधिकृत राजपत्रानुसार आठवड्याभरात सव्वाआठ लाख चौ.मी. जमिनीचे क्षेत्र बदलले

पणजी, दि. ३१ (प्रतिनिधी) :


**पणजी, दि. २५ : भविष्यात गोव्यात काँक्रीटचे जंगल पाहण्याची तयारी ठेवा. कारण नगर नियोजन कायदा कलम १७ (२) च्या तरतुदींचा वापर करून मार्च महिन्यातील दुसऱ्या आठवड्यात चक्क ८ लाख चौ. मी. जमीन सेटलमेंट झोनमध्ये रूपांतरित करण्यात आली आहे. आदर्श आचारसंहिता लागू होण्याच्या अवघ्या काही दिवसांपूर्वी हे रूपांतर करण्यात आले आहे. गेल्या एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ या दरम्यान एकूण १६,५८,५७८ चौ. मी. जमिनीचे रूपांतर करण्यात आले आहे. यातील ५० टक्के जमीन एप्रिल ते फेब्रुवारी या ११ महिन्यांच्या कालावधीत रूपांतरित करण्यात आली आहे, तर उर्वरित ८,२५,६४८ चौ. मी. जमिनीचे रूपांतरण लोकसभा निवडणूक जाहीर होण्यापूर्वी दोन दिवस अगोदर संपलेल्या ७ मार्च ते १४ मार्च या आठ दिवसांच्या कालावधीत करण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. दरम्यान, अधिकृत राजपत्रानुसार वर्षभरात १६ लाख चौ. मी. जमिनीचे क्षेत्र बदलण्यात आल्याविषयी मुख्य नगर नियोजक राजेश नाईक यांना विचारले असता, आपल्याला त्याची माहिती नाही पण तुम्ही माहिती मिळवली आहे तर ती ठीक असेल, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.**

सामाजिक कार्यकर्ते स्वप्नेश शेर्लेकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, १२ मार्च आणि १४ मार्च रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या राजपत्रात अर्जदाराचे नाव आणि प्रादेशिक आराखडा २०२१ मध्ये संबंधित जमिनीचे क्षेत्र याची माहिती वगळण्यात आले आहे. ७ ते १४ मार्च दरम्यान रूपांतरित करण्यात आलेल्या जमिनींपैकी ३५ टक्के भूखंडांचे क्षेत्र नमूद करण्यात आलेले नाही, असे ते म्हणाले.


आर्किटेक्ट आणि नियोजक ताहीर नोरोन्हा यांनी दिलेल्या माहितीनुसार, जमिनीच्या मूळ मालकांनी अर्ज केलेला नाही तर हल्लीच जमीन खरेदी केलेल्या नव्या मालकांनी रूपांतरासाठी अर्ज केलेला आहे, जे रिअल इस्टेटशी संबंधित आहे. उच्च न्यायालयात २७ प्रतिवाद्यांनी आपले प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. यातील एकच व्यक्ती साल २०२० पूर्वीपासून जमिनीचा मालक आहे. प्रादेशिक आराखडा तयार करण्यात आला तेव्हा तुम्ही जमिनीचे मालक नव्हता तर क्षेत्र बदल करण्यासाठी तुम्ही अर्ज कसे काय करू शकता. १७ (२) सारखी कलमे इतर राज्यात अस्तित्वात नाही. जगाच्या कोणत्याच देशात असे कलम नसावे, असे ते म्हणाले. जुने गोवेतील अनेक अर्जदार हे एकतर राजकारणी आहेत किंवा मोठ्या रिअल इस्टेट कंपन्यांत आहेत. गोव्यात सर्वत्र हीच स्थिती आहे.

पिळर्ण येथील रहिवासी प्रा. सोलानो दा सिल्वा यांनी सांगितले की, पिळर्ण बार्देश येथील तलावाच्या पाणलोट क्षेत्राचे जमीन रूपांतर एका रिअल इस्टेट कंपनीसाठी करण्यात आले आहे.

केवळ नऊ रिअल इस्टेट कंपन्यांच्या फायद्यासाठी पिळर्ण मार्रा येथील ८६ हजार चौ. मी. जागेचे क्षेत्र बदलण्यात आले असून, पाच महिन्यांत वसाहती २२ टक्क्यांनी वाढल्या आहेत. सावळे येथे २ फेब्रुवारी रोजी जागतिक पाणथळ दिन साजरा केला आणि १२ दिवसांनी या पाणलोट क्षेत्राचे रूपांतर करण्यात आले, असे दा सिल्वा यांनी सांगितले.




> एप्रिल २०२३ पर्यंत सरकारने सर्वे क्रमांक, गाव, दुरुस्तीची शिफारस करणाऱ्या सल्लागाराचे नाव, चौ.मी. मध्ये एकूण क्षेत्रफळ, प्रादेशिक आराखडा २०२१ नुसार जमिनीचे मूळ क्षेत्र आदी माहिती सरकारने प्रसिद्ध केली होती. मात्र, दाक्षिणात्य अभिनेता रामचरण तेज आणि गंगारेड्डी इन्फ्रा प्रा. लि. यांच्या नावांचा समावेश असलेल्या मांद्रे येथील ६४ हजार चौ.मी. जागेचा विषय आम्ही उपस्थित केल्यानंतर सरकारने मे २०२३ ते १२ मार्च २०२४ पर्यंतच्या राजपत्रात अर्जदाराचे नाव छापणे बंद केले.
> – **स्वप्नेश शेर्लेकर**, सामाजिक कार्यकर्ते



## निवडक

### कुंकळ्ळीत कालव्यात पडून मुलीचा मृत्यू

टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २५ :** कुंकळ्ळी औद्योगिक वसाहत परिसरात राहणाऱ्या एका ९ वर्षीय मुलीचा जवळूनच वाहणाऱ्या पाण्याच्या तलावात बुडून मृत्यू ओढवला. पूर्णिमा अजोय चौधरी असे मुलीचे नाव असून, कुटुंबीय मूळ पश्चिम बंगाल येथील आहे. मुलगी विशेष होती. मुलगी नजर कुटुंबीयांची नजर चुकवून जवळच असलेल्या कालव्याजवळ गेली व कालव्यात पडली. त्यानंतर तिने आरडाओरड केल्यानंतर वडिलांनी येऊन मुलीला पाण्याबाहेर काढले व बाळ्ळीतील आरोग्य केंद्रात उपचारासाठी नेले. मात्र, याठिकाणी त्याला मृत घोषित केले. मुलीचे कुटुंबीय मूळ पश्चिम बंगाल येथील असून, कामानिमित्त गोव्यात आले होते व कुंकळ्ळी औद्योगिक वसाहत परिसरात वास्तव्यास होते. कुंकळ्ळी पोलिसांनी याप्रकरणी अनैसर्गिक मृत्यू म्हणून नोंद केली असून, कुंकळ्ळी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

### मनीष सिसोदियांच्या कोठडीत वाढ

**नवी दिल्ली, दि. २५ :**

मद्यधोरण गैरव्यवहार प्रकरणातील आरोपी आणि आम आदमी पक्षाचे (आप) नेते मनीष सिसोदिया यांच्या कोठडीत राऊज अव्हेन्यू न्यायालयाने ७ मेपर्यंत वाढ केली आहे. याच प्रकरणात आरोप असलेले दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल तसेच भारत राष्ट्र समितीच्या(बीआरएस) नेत्या के. कविता यांची कोठडी अलीकडेच न्यायालयाने वाढवली होती. केंद्रीय अन्वेषण विभागाकडून (सीबीआय) दाखल करावयाच्या दोषारोप पत्राच्या अनुषंगाने न्यायालयात स्वतंत्र सुनावणी झाली. यावेळी एक तक्ता बनवून सिसोदिया यांच्याविरोधातील पुरावे द्यावेत, असे निर्देश न्यायालयाने दिले. मद्यधोरण गैरव्यवहार प्रकरणी सीबीआयने गतवर्षीच्या फेब्रुवारी महिन्यात सिसोदिया यांना अटक केली होती. त्यानंतर सक्तवसुली संचालनालयाकडून (ईडी) नऊ मार्च २०२३ रोजी सिसोदिया यांना अटक झाली होती.

### महुआ मोईत्रा यांना दिलासा

**नवी दिल्ली, दि. २५ :**

लोकसभा निवडणुकीपूर्वी तृणमूल काँग्रेसच्या नेत्या महुआ मोईत्रा दिलासा मिळालाय. वकील जय अनंत देहाद्राई यांनी महुआ मोईत्रा यांच्याविरोधातील मानहानीचा खटला मागे घेतला आहे. वकील जय अनंत देहाद्राई यांनी दिल्ली हायकोर्टामध्ये यासंदर्भात अर्ज करत मानहानीचा खटला मागे घेत असल्याचे म्हटले आहे. महुआ मोईत्रा यांनी सोशल मीडियावर काही पोस्ट केल्या होत्या. त्यामध्ये देहाद्राई यांच्या खासगी आणि व्यावसायिक कामाबाबत आक्षेपार्ह वक्तव्य केल्याचा आरोप करण्यात आला होता. त्यानंतर देहाद्राई यांनी महुआ मोईत्रा यांच्याविरोधात दिल्ली हायकोर्टात २ कोटी रुपयांचा मानहानीचा खटला दाखल केला होता. महुआ मोईत्रा यांची प्रश्नांच्या बदल्यात गिफ्ट घेतल्याप्रकरणी खासदारकी गेलीय. त्याचदरम्यान महुआ मोईत्रा यांनी देहाद्राई यांच्यावर टीका केली होती. यासर्व प्रकरणामध्ये देहाद्राई यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. सर्व सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर आक्षेपार्ह मजूकर हटवण्यात, यावा अशी मागणी त्यांनी केली होती.

### हवामान

कमाल : ३० किमान : २४
आर्द्रता : ८९

### बाजार भाव

सोने : ₹ ७१,७५० (१० ग्रॅम)
चांदी : ₹ ८१,१०० (१ किलो)

### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ७४,३३९.४४ ↓ (४८६.५०)
निफ्टी : २२,५७०.३५ ↓ (१६७.९५)

# टीसीपी कायद्यातील सुधारणा तात्काळ रद्द करा

- जीबीएच्या सभेत मागणी
- जमिनी वाचविण्यासाठी लढण्याची घेतली शपथ

टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २५ :** नगर नियोजन (टीसीपी) कायद्यात नुकत्याच करण्यात आलेल्या सुधारणांचा निषेध करण्यासाठी गोवा बचाव अभियान (जीबीए) तर्फे आयोजित मडगाव येथील ग्रेस चर्च सभागृहात सभेला नागरिकांनी गुरुवारी मोठी गर्दी केली, अखेरच्या क्षणी सभास्थळ बदलण्यात आले असले तरी या सुधारणांमुळे अनियंत्रित विकासापासून आपल्या जमिनी वाचविण्यासाठी लढण्याची शपथ उपस्थितांनी घेतली. नगर रचना (टीसीपी) कायद्यात नुकत्याच करण्यात आलेल्या सुधारणांचा निषेध करणारे आणि ते तात्काळ रद्द करण्याची मागणी करणारे ठराव उपस्थितांनी एकमताने मंजूर केले.

नगर नियोजन कायद्यातील १७ (२), ३९ (अ), १७ (ड) या सुधारणा रद्द कराव्यात आणि त्याअंतर्गत करण्यात आलेले सर्व जमिनीचे रूपांतर रद्द करावे, या प्रमुख मागण्या या सभेत मांडण्यात आल्या. बाह्य विकास आराखडा (ओडीपी) आणि इतर झोनिंग क्षेत्रांसारख्या नियोजन क्षेत्रांमध्ये लागू असलेल्या एकाच आराखड्याच्या निकषांचे पालन केले पाहिजे, असे ठराव यावेळी घेण्यात आले. प्रादेशिक नियोजन प्रक्रियेत घटनात्मक अधिकारांनुसार लोकसहभाग असावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली आहे. शाश्वत विकास उद्दिष्टांनुसार (एसडीजी) पर्यावरण रक्षणाशी सुसंगत नियोजन करण्याच्या गरजेवरही सभेतील वक्त्यांनी भर दिला.

तसेच विद्यमान नेतृत्वाला नाकारताना मुख्य नगर नियोजक राजेश नाईक यांना दिलेली मुदतवाढ रद्द करण्याची जोरदार मागणी करण्यात आली. नगर नियोजक नाईक यांना त्वरित निलंबित करावे आणि त्यांच्या कार्यकाळात झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# ‘धार्मिक संदेश’ म्हणून केलेल्या अन्नत्यागामुळे मृत्यू ?

- आके येथील दोन भावांच्या मृत्यूचे गूढ अजून कायम
- आईवर उपचार सुरू

टीम दैनिक हेराल्ड





**मडगाव, दि. २५ :** आके येथील राहत्या घरात झालेल्या दोन भावांच्या मृत्यूचे गूढ अजूनही कायम असले तरी अनेक दिवसांच्या उपासमारीमुळेच हे मृत्यू झाले असावेत या प्राथमिक निष्कर्षावर या प्रकरणाचा तपास सुरू आहे. या दोन्ही मृतदेहांचे शवविच्छेदन पूर्ण झाले असून उपासमारीमुळेच दोघांचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले आहे. याच घरात अत्यवस्थेत आढळून आलेल्या या दोन्ही भावांच्या आईच्या प्रकृतीत सुधारणा झाल्यानंतर तिचा याबाबत पूर्ण जबाब घेण्यात येईल, अशी माहिती तपास अधिकाऱ्यांनी दिली आहे. दरम्यान, धार्मिक परंपरेच्या पूर्ण अमलाखाली गेल्याने या दोन्ही सुशिक्षित भावांनी आणि त्यांच्या मातेने उपाशी राहण्याचा निर्णय घेतला असावा आणि त्यातून हे घडले असावे, अशी शक्यता पोलिसांकडून वर्तवण्यात येत आहे.

आके मधील पॅराडाईज इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर राहणाऱ्या मोहम्मद जुबेर खान आणि अफान खान या दोन तरुण भावांचे मृतदेह बुधवारी संध्याकाळी त्यांच्या राहत्या घरात पोलिसांना आढळून आल्यानंतर या मृत्यूंचे गूढ उकलण्याचा प्रयत्न पोलिस करीत आहेत. याच घरात अत्यावस्थेत आढळून आलेली त्यांची आई रुक्साना हिच्या प्रकृतीत सुधारणा झाल्यानंतर तिचा सविस्तर जबाब नोंदवला जाणार आहे. मडगाव पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार ती सलाईनवर असल्यामुळे ती जबाब देण्यास सध्या सक्षम नाही. तसेच रुक्साना खानला मानसोपचारांची गरज असून तिला मेंटल हॉस्पिटल बांबोळी येथे उपचारासाठी पाठवावे, असे मत डॉक्टरांनी व्यक्त केल्याचे पोलिसांनी सांगितले. दरम्यान, दोन्ही मृतदेह शवविच्छेदन तपासणीनंतर कुटुंबीयांच्या ताब्यात देण्यात आले. याबाबत पोलिसांना प्रथम माहिती देणारे या दोन्ही भावांचे वडील नजीर खान यांचाही जबाब नोंदवण्यात येणार आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार नजीर खान यांचे आपल्या पत्नीशी टोकाचे मतभेद असल्याने ते आपल्या कुटुंबासमवेत राहत नव्हते. तसेच आई रुक्साना आणि तिच्या दोन्ही मुलांनी गेल्या तीन महिन्यापूर्वी स्थानिकांपासून पूर्णपणे संपर्क तोंडल्याची माहिती देखील सूत्रांनी दिली आहे. गेले

पान २ ▶

### कुटुंबीय सधन तरीही..

आके, मडगाव येथे फ्लॅटमध्ये राहणारे हे कुटुंबीय सधन होते. फ्लॅटमध्ये ही सर्व सुखसोयी होत्या. मडगावात दुकान ही भाडेपट्टीवर दिले होते. त्यातून भाडेही मिळत होते. उपअधीक्षक सलीम शेख यांनी ही माहितीला दुजोरा दिला. मात्र, घरात जेवण, आहार बनविण्यासाठी काहीच साहित्य नव्हते. अन्नाचा एक कण ही नव्हता. केवळ एका डब्यात काही मिरच्या होत्या. सधन असले तरी आवश्यक अन्न, आहार न घेतल्यानेच दोघा भावांना आपले प्राण गमवावे लागल्याचा पोलिसांचा अंदाज आहे.

### नोव्हेंबर, २०२३ पासून संपर्क होता बंद

महमद जुबेर खान याची शादी झाली होती तरी त्यांची पत्नी शिक्षण घेण्यासाठी म्हणून सावंतवाडी, महाराष्ट्र येथे वास्तव्यास होती. अधूनमधून फोनवरून या दोघांचे बोलणे होत होते. यावेळी महमद खान यांच्या पत्नीला हे कुटुंबीय कट्टर धार्मिक बनल्याचे कळून चुकले होते. त्याचबरोबर नोव्हेंबर, २०२३ पासून महमद जुबेर खान व त्याची पत्नी यांच्यामधील संपर्क कायमचा बंद झाला होता, अशी माहिती त्याच्या पत्नीने पोलिसांना दिलेल्या जबानीतून पुढे आली असल्याचे उपअधीक्षक सलीम शेख यांनी सांगितले.

### रुक्सानाचा उपासासाठी दबाव ?

रुक्साना ही महमद जुबेर खान यांच्या पत्नीवर उपवास करण्यासाठी दबाव आणत होती. उपवास करून केवळ एक खजूर खाऊन दिवस काढणे गरजेचे असल्याचे रुक्साना आपल्या सुनेला सांगत होती. त्यामुळे सूनही दबावाखाली होती व या कुटुंबीयांच्या कट्टरतेचा धसका घेऊन त्यांच्यापासून दूर राहणे पसंत केले होते, अशी माहिती पोलिस तपासात पुढे आली आहे.

# रगाडातील उत्खननाची चौकशी करा

## चार महिन्यांत शिस्तभंगाच्या कारवाईचे मुख्य सचिवांना आदेश

टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २५ :** वन व वन्यजीव कायद्याने संरक्षण असताना रगाडा नदीतून मोठ्या प्रमाणात वाळू, खडी व दगड उत्खननाचे अनधिकृत काम कसे करण्यात आले, याची चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने गुरुवारी मुख्य सचिवांना दिले आहेत. यासाठी न्यायालयाने चार महिन्यांची मुदत दिली आहे. यासंदर्भात २०१९ साली स्वेच्छा दखल घेत दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेवर सुनावणीवेळी वरील आदेश देण्यात आले. वन आणि वन्यजीव कायद्याने संरक्षण असतानाही खाण आणि भूगर्भ संचालनालय, पोलिस, वन आणि महसूल अधिकाऱ्यांच्या नकळत हा प्रकार कसा घडला, याची चौकशी करण्याचे आदेश मुख्यसचिवांना देण्यात आले आहेत. तसेच, नियुक्त अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून संबंधित अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करावी का, याचा विचार करण्याचे निर्देशही मुख्य सचिवांना देण्यात आले आहेत.



स्वप्निल मळीक नामक उल्लंघनकर्त्याकडून देय असलेली ४६.४५ लाख रुपये वसूल करण्याचे आदेश न्यायालयाने महसूल सचिवांना दिले आहेत. लघू खनिजाच्या मोठ्या प्रमाणात सुरू असलेल्या बेकायदा उत्खननावर नियंत्रण ठेवण्यासाठी आराखडा तयार करण्याचे निर्देश सरकारला देण्यात आले आहेत.

राज्यात विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात अनधिकृत वाळू उपसा किंवा उत्खननाच्या घटना घडत असल्याचे स्पष्ट झाले आहे, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. मात्र, गोव्याच्या नैसर्गिक

पान २ ▶

# विरियातोंच्या व्हिडिओवरून विनाकारण वाद : ग्रासियस

टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २५ :** कॅ विरियातो फर्नांडिस यांच्या भाषणातील काही भाग मुद्दामहून कापण्यात आला असून, तो सर्वदूर करण्यात आला असल्याचा दावा ॲड. राधाराव ग्रासियस यांनी केला आहे. यातून विनाकारण वाद निर्माण केला जात असल्याचे त्यांनी म्हटले आहे. जर पूर्ण व्हिडिओ पाहिला तर कॅ विरियातो यांना नेमके काय म्हणायचे आहे ते स्पष्ट होते, असे त्यांनी स्पष्ट केले.

भारत १९४७ साली स्वतंत्र झाला आणि १९५० साली देशाने नवीन संविधान लागू केले. १९६१ साली गोवा भारताचा भाग बनला. संविधानाची सुरुवात आम्ही भारतीय या शब्दांनी होते. पण संविधान लागू झाले तेव्हा पाकिस्तान, चीन, पोर्तुगालचे नागरिक या व्याख्येत येत नव्हते. जेव्हा संविधान लागू झाले तेव्हा गोव्यातील लोक पोर्तुगालचे नागरिक होते. त्याकाळी उद्योजक वैकुंठराव धेंपे यांची नियुक्ती पोर्तुगालच्या संसदेत करण्यात आली होती. तेव्हा दोन गट होते, एकाने पोर्तुगालला पाठिंबा दिला आणि दुसऱ्या गटाने पोर्तुगालला

पान २ ▶

# ईव्हीएमबाबत आज अंतिम सुनावणी

- दुसऱ्या टप्प्यातील ८९ मतदारसंघात आज मतदान

**नवी दिल्ली, दि. २५ :**

इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीनमध्ये नोंदण्यात आलेल्या मतांसह व्हीव्हीपीएटीची १०० टक्के पडताळणी करण्याच्या मागणी करणाऱ्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालय आज ( शुक्रवारी ) निकाल देणार आहे. लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात ८८ जागांवर मतदान होत असताना हा निकाल येणार आहे. न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती दीपंकर दत्ता यांच्या खंडपीठाकडून सकाळी १०:३० च्या सुमारास हा निकाल दिला जाण्याची शक्यता आहे. याचिकाकर्त्यांमध्ये नॉन–प्रॉफिट असोसिएशन ऑफ डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स आणि इतरांचा समावेश आहे.

बुधवारी याचिकांवरील सुनावणीदरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने आपला निर्णय राखून ठेवण्यापूर्वी, म्हटले होते की न्यायालय निवडणुकांवर नियंत्रण ठेवू शकत नाही किंवा निर्देश जारी करू शकत नाही कारण ईव्हीएमच्या कार्यक्षमतेबद्दल शंका उपस्थित केली गेली आहे. निकालांमध्ये फेरफार करण्यासाठी ईव्हीएममध्ये छेडछाड केली जाऊ शकते, असा आरोप याचिकाकर्त्यांचा आहे. तथापि, न्यायालयाने म्हटले आहे की ते ईव्हीएमच्या फायद्यांवर शंका घेणाऱ्यांची विचार प्रक्रिया बदलू शकत नाहीत सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्याकडून ईव्हीएमच्या कार्यप्रणालीशी संबंधित पाच प्रश्नांची उत्तरे मागितली ज्यामध्ये मायक्रोकंट्रोलर बसवलेले आहेत की नाही ते पुन्हा प्रोग्राम

पान २ ▶